# आमचा तारक येशू याचा जन्मोत्सव आम्ही साजरा करतो

**प्रार्थना:** ''प्रिय स्वर्गीय पित्या, तू आम्हांला तुझा प्रभु येशू ही दिलेली सर्वात मोठी, अत्यत प्रिय देणगी आहे. तिची प्रशंसा मुलांनी करावी यासाठी तू कृपा करुन ह्या पाठाचा उपयोग करुन घे''


तुमच्या योजना व स्थानिक रिवाज ह्यांना अनुरुप असे कार्यक्रम निवडा.

1. **येशूच्या जन्माविषयीची गीते गा.**

   काही विश्वासणारे नाताळच्या काळात मित्रांच्या घरापुढे येशू जन्माची गीते गातील.

2. **पुढे दिलेले गव्हाणीचे चित्र काढा किंवा रंगवा.**

- येशू सर्वप्रथम गव्हाणीत निजला. गव्हाणी म्हणजे गाई गुरे व शेळया मेंढयाना खायला गवत ठेवले जाते ती पेटी.



- मुलांना त्यांनी काढलेली चित्रे नाताळ साजरा करताना मोठया माणसांना दाखवू द्या.
- येशू अत्यंत गरीब ठिकाणी कसा जन्मला याची गव्हाणी आम्हांला आठवण करुन देते, हे मुलांना सांगू द्या. तरीही लोकांनी तो देवाचा पुत्र आहे हे ओळखले नाही.

3. **येशूच्या जन्माचा वृत्तांत लूक 1:26-38 व लूक 2:1-20 यामधून मुलांना सांगा**

- देवाचा पुत्र येशू याच्या जन्माविषयीचा हा वृत्तांत मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी वाचून दाखवावा.
- देवाचा पुत्र मनुष्य म्हणून जन्माला आला तो राजाच्या राजवाडयात नाही तर जनावरांना बांधण्याच्या गोठयात त्याने जन्म घेतला.

**प्रश्न.** वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा. प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उत्तर दिलेले आहे.

अ) मरीयेने देवदूताला पाहिले तेव्हा तिला काय वाटले? *पाहा/लूक 1:29.*

ब) येशू विषयी देवदूताने कोणती अभिवचने दिली? *पाहा लूक 1:32-33.*

क) देवदूताच्या संदेशाला मरीयेने कसा प्रतिसाद दिला? *पाहा लूक 1:38.*

ड) योसेफ व मरीया हयां बेथलेहेम येथे का जावे लागले? *पाहा लूका 2:1-3 (रोमन सम्राटाने लोकांना नावनिशी लिहिण्यासाठी आप आपल्या जन्मगावी जाण्याची आज्ञा केली होती)*

ई) मरीयेने नविन जन्मलेल्या बाळाला कोठे ठेवले? *पाहा लूक 2:7.*

फ) त्या रात्री मेंढपाळ का घाबरले? *पाहा 2:8-10*

ग) कोणते बाळ येशू आहे हे मेंढपाळांना कसे समजणार होते? *पाहा लूक 2:11-12*

ह) येशूला पाहिल्यावर मेंढपाळांनी काय केले? *पाहा लूक 2:20*

**4. येशूच्या जन्मच्या प्रसंगाचे नाट्यीकरण मुलांनी मोठयांसाठी सादर करावे.**

ही नाटिका काही आठवाडे आधीच सुरु करा.

- वेळ कमी असेल तर तग नाटिकेतील कमी महत्वाचा भाग वगळा.
- मुलांची संख्या कमी असेल तर प्रौढांची मदत घ्या किंवा शेजाऱ्यांच्या मुलांना लहान भूमिका द्या.
- प्रसंग व स्थानिक रिवाजांनुसार नाटिकेमध्ये आवश्यक ते फेरबदल करा.

**शिक्षक आणि मोठया मुलाची तयारी**

- **निवेदक** वृत्तांत थोडक्यात सांगण्याचा सराव करा. मुलांना त्यांनी काय व कसे बोलायंचे हे समजावून सांगा.
- **मरीया व योसेफ** मरीया येशू म्हणून एक बाहुली हातात घेईल ती बाहुली कापडात गुंडाळा.
- गब्रीएल देवदूत शक्य असल्यास पांढरा अंगरखा घाला. पांढफ्रया रंगाची चादर अंगरखा म्हणून पांघरता येईल.

**लहान मुलांसाठी तयारी:**

- **उतारशोळचा मालक,** गोठयातील गाई, मेंढपाळ व त्यांची मेंढरे हे हुबेहुब तयार करा.
- मेंढपाळांच्या हातात **मेंढपाळाची** काठी (लांब काठया) द्या.
- गव्हाणी तयार करण्यासाठी एका मोठया खोक्याता वाळलेले गवत ठेवा.

**वृत्तांताचा भाग 1 (मरीया व गब्रीएल देवदूत)**

**निवेदक:** लूक 1:26-38 ही वचने वाचून दाखवा किंवा लक्षात ठेवून सांगा. मग म्हणा, ‘‘गब्रीएल देवदूत काय म्हणतो ते ऐका’’

**गब्रीएल:** (मोठयाने बोला) ‘‘अभिवादन मरीया घबारू नकोस तुला बाळ होणार आहे, तो येशू परात्पराचा पुत्र असेल तो राजा होईल’’

**मरीया:** ‘‘पण माझे लग्न झालेले नाही’’

**गब्रीएल:** ‘‘तुला देव बाळ देणार आहे’’

**मरीया:** ‘‘प्रभूची दासी आहे, आपण सांगितल्या प्रमाणे मला होवो’’

**भाग 2 (मरीया, योसेफ, मेंढपाळ, उतारशाळेचा मालक, गाई)**

**निवेदक:** लूक 2:1-7 हा भाग वाचून दाखवा किंवा लक्षात ठेवून सांगा.मग म्हणा, ‘‘योसेफ काय म्हणतो ते ऐका.’’

**योसेफ:** ‘‘मरीया, आपण नावनिशी करण्यासाठी बेथलेहेमला जाऊ या. सम्राटाने तसा हुकूम दिला आहे.’’

**मरीया:** ‘‘पण आता लवकरच बाळाचा जन्म होईल.’’

**योसेफ:** मरीयेचा हात धरुन तिच्याबरोबर एका बाजूने चालत जाऊन परत या.

**मरीया:** ‘‘योसेफ लवकर चला ना! बाळाचा आता जन्म होईलच. ते बघा इथे घर दिसते आहे.’’

**योसेफ:** उतारशाळेचा मालक उभा आहे तिथे चालत जा. दार ठोठावल्याचा अभिनय करा. ‘‘ठक्! ठक्! ठक्!’’ ओठयाने ओरडा ‘‘मालक, आमच्याकरीता एखादी खोली मिळेल का?’’

**उतारशाळेचा मालक:** ‘‘खोली तर नाही, पण गयींचा गोठा आहे तिथे तुम्हांला झोपता येईल.’’

**योसेफ:** मरीयेला हाताने धरुन हळूवारपणे गव्हाणीकडे न्या.

**गाईगुरे:** हातावर व गुडघ्यांवर बसून मरीयेच्या अवती भवती फिरा. तोंडाने गाईसारखा आवाज करा

**मरीया:** बाहुली कापडात गुंडाळून घ्या. तिला खोक्यात ठेवून म्हणा, ''येशू जन्मला!''

**भाग 3 ( मेंढपाळ व मेंढरे )**

**निवेदक:** लूक 2:8-20 हा भाग वाचून दाखवा किंवा लक्षात ठेवून सांगा. मग म्हणा, ''मेंढपाळ काय म्हणतात ते ऐका.''

**मेंढपाळांपैकी तिघेजण म्हणतात:** ''आज फारच थंडी वाजत आहेना.'' ''चांदणंही चांगल पडलं आहे.'' ''मेंढरेही शांत आहेत.''

**मेंढरे:** हातावर व गुडघ्यांवर बसून मेंढपाळांच्या अवतीभवती फिरा. तोंडाने मेंढरांसारखा आवाज करा.

**देवदूत व मेंढपाळ:** देवदूत प्रगट होतात मेंढपाळ घाबरून जमिनीवर पडतात

**देवदूत:** ''मेंढपाळहो! घाबरू नका, आम्ही तुम्हांला सुवार्ता सांगायला आलो आहोत बाळ जन्मले आहे तो ि स्त प्रभु आहे. तो तुम्हांला बांळत्याने गुंडाळलेला बेथलेहेममधील एका गव्हाणीत आढळेल,''

**मेढपाळांचा प्रमुख:** ''चला चला आपण जाऊन पाहू!''

**मेंढपाळ:** (येशू आहे तिकडे पळत जा खोक्यात वाकून पाहा आणि गुडघे टेकून नमन करा. काही क्षणांनी उठा)

**मेंढपाळांचा प्रमुख:** ''देवाची स्तुती असो देवाचा अभिषिक्त ख्रिस्त जन्मला आहे प्रभु आमच्या बरोबर आहे!''

**निवेदक:** नाटिका संपल्यावर मुलांचे आणि याकरीता मदत करणाऱ्या प्रत्येकोचे आभार माना,

**प्रश्न,** कृती न. 2 मध्ये दिलेले प्रश्न मुलांनी मोठया माणसांना विचारावेत, **पाठ करा** लूक 2:14

**गीत,** लूक 1:46-55 ह्या शास्त्रभागातील मरीयेच्या प्रार्थनेतील वचने तीन मुलांना म्हणव्यास सांगा. यातील प्रत्येक वाक्य मुलांना तुमच्या मागे म्हणायला सांगा.

''ऊर्ध्वलोकी देवाला गौरव'' (मुलांनी मागे म्हणावे)

''प्रभु तू आम्हांला तुझा पुत्र दिलास याबद्दल आम्ही तुझी स्तुती करतो.'' (मुलांनी मागे म्हणावे)

''तू आपल्या पुत्रासाठी मोठा राजवाडा दिला नाहीस.'' (मुलांनी मागे म्हणावे)

''तू त्याला गरीब व असहाय्य लोकांकडे पाठवलेस.'' (मुलांनी मागे म्हणावे)

''तू त्याला आमची सर्व वाईट गोष्टींपासून व दु: खापासून सुटका करण्याकरीता पाठवलेस.''(मुलांनी मागे म्हणावे)

''मेंढपाळ व देवदूतांप्रमाणे आम्ही मोठया आनंदाने त्याच्या जन्माचा उत्सव साजरा करतो'' (मुलांनी मागे म्हणावे)

''येशूच्या नावात, आमेन'' (मुलांनी मागे म्हणावे)

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net